जा.क्र.कृतंमाकें/रसा/३०३/२०२१
कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र
डॉ. बा.सा.को.कृ.वि. दापोली
दिनांक :—१८/०१/२०२१

प्रति,

________________
________________
________________
________________

**विषय** :—रक्षक सापळे खरेदी करणेबाबत............

वरील विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, विस्तार शिक्षण संचालनालयाच्या अंतर्गत असलेल्या कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र कार्यालयास खाली नमूद केल्याप्रमाणे रक्षक सापळे खरेदी करावयाचे आहेत.

| अ.क्र | तपशिल | परिमाण |
|---|---|---|
| १ | रक्षक सापळा | १६५० नग |

**अटी व शर्ती** :—

१. प्लास्टिक जार २ mm जाडी (ONHS) जार कॅप (P/20) थ्रेडेड प्लास्टिक पाईप (P/20), थ्रेडेड प्लास्टिक प्लेट (P/20), राऊंड डबी विथ कॅप (P/20) याचे साचे हे या केंद्रामार्फत देण्यत येतील. परंतु आकृती मधील नमूद प्लास्टीक हूक, दोन प्लास्टीक साखळया, ४ एम. एस. रिंग (२० मीमी व्यास) पॅकिंग बॉक्स छपाई करुन पुरवठादाराने द्यावयाचे आहे. (२२ सेमी लांबी X २२ सेमी रुंदी X २२ सेमी उंची)
२. रक्षक सापळयाचा दर हा प्रति नगाचा सर्व करासहीत, वाहतुक खर्च अंतर्भुत करुन नमुद करावा.
३. आपण नमुद केलेल्या दरानुसार मागणी कमी जास्त होऊ शकते याची नोंद घ्यावी.
४. पुरवठादाराने रक्षक सापळयाचे पाचही साचे कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, दापोली येथून घेऊन जाणे व रक्षक सापळयासोबत पुन्हा कार्यालयात सुस्थितीत पोहोच करणे बंधनकारक राहील. सदर वाहतुकीसाठी येणारा खर्च देखील दरपत्रकात नमूद करावा.
५. बंद लखोटयातील दरपत्रके दि. २७/०१/२०२१ पर्यंत व्यवस्थापक, कृषि तंत्रज्ञान माहिती
केंद्र, डॉ.बा.सा.को.कृ.वि. दापोली, जि. रत्नागिरी, पिन ४१५७१२ या कार्यालयात पोहोच होणे आवश्यक आहे.
६. बंद लखोटयावर 'रक्षक सापळा' तयार करण्यासाठीचे दरपत्रक' असे स्पष्ट नमूद करावे.
७. विहित मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दि. २८/०१/२०२१ रोजी या कार्यालयात उघडण्यात येतील.
८. टपाल खात्याच्या विलंबास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.
९. दरपत्रके पुरवठाधारकाने जीएसटी क्रमांक नमूद करावा.
१०. जीएसटी क्रमांक लागू नसल्यास तत्सम प्राधीकरणाकडील नोंदणी क्रमांक असलेले पुरवठाधारकाचे लेटरहेड वरील दरपत्रक आवश्यक, सोबत पॅनकार्ड प्रत जोडणे आवश्यक आहे.

११.अधिकृत विक्रेता अथवा उत्पादक असल्यास तसे प्रमाणपत्र जोडावे तसेच संबधित कंपनीची अधिकृत दरसुची सोबत जोडावी.

१२. दरपत्रकात संबधित सर्व करांचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

१३. कार्यालय कोणतेही कारण न देता आपल्या एकमेव स्वेच्छाधिकारावर हे दरपत्रक रद्द करण्याचा/मागे घेण्याचा/दुरुस्त करण्याचा/नियत तारीख वाढविण्याचा अधिकार राखून ठेवत आहे.

१४. रक्षक सापळा तयार करण्याची ऑर्डर दिल्याच्या तारखेपासून रक्षक सापळे पाच पुरवठा ३० दिवसात कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, डॉ.बा.सा.को.कृ.वि. दापोली येथे कार्यालयीन वेळेत केला पाहिजे.

१५. रक्षक सापळा हे विद्यापीठाचे तंत्रज्ञान असल्याने सदर सापळयाची प्रतिकृती/मोल्ड पुरवठादाराने विद्यापीठाव्यतिरिक्त अन्य कोणालाही विक्री/पुरवठा करु नये.

१६. नमूना सापळा, त्याची आकृती व पॅकींग बॉक्सवर छापावयाचा मजकूर विद्यापीठाच्या कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्रामध्ये विद्यापीठाच्या www.dbskkv.org या संकेतस्थळावर पाहता येईल.

संचालक
विस्तार शिक्षण
डॉ.बा.सा.को.कृ.वि.दापोली

प्रत:

१) व्यवस्थापक, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, डॉ. बा. सा. कोकण कृषि विद्यापीठ, दापोली. सदरच्या जाहिरातीस विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात यावी.

२) विद्यापीठातील सर्व सुचना फलक.

# फळमाशी रक्षक सापळा (Rakshak Trap)








Scanned by TapScanner




Scanned by TapScanner 9/3